अहिल्यानगर महानगरपालिका,अहिल्यानगर
स्टोअर विभाग जा.क्र.- २२३
दिनांक. 15 /10/2026

**अहिल्यानगर महानगरपालिका,अहिल्यानगर**
**स्टोअर विभाग**
**ई-निविदा सुचना क्रमांक : 07 दि. 15 /10/2026**
**ई-निविदा क्र. -2026_ANMC_1345033_1**

मा.स्थायी समिती,अहिल्यानगर महानगरपालिका यांचे मान्यतेने अहिल्यानगर महानगरपालिका सर्व दवाखाने व रक्तपेढी करिता सन.2026-2027 या आर्थिक वर्षा करिता लागणारे औषधे,रसायने,वैद्यकिय साहित्याचे वार्षिक निविदा दर निश्चित करणेकामी ऑनलाईन पध्दतीने ई-निविदा मागवित आहे.निविदे बाबतच्या या व्यतिरिक्त असलेल्या अटी व शर्ती निविदा फॉर्म मध्ये नमुद केल्या असुन निविदा फॉर्म विक्री व निविदा प्रक्रियेबाबतचा तपशिल खालिल प्रमाणे.

| Sr.No | Envelopes | Start Date & Time | Expiry Date & Time |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| 1) | निविदा विक्री व तयार करणे | 15 / 10 /2026 18:15 | ३1 / 10 /2026 18:15 |
| 2) | निविदा स्विकृती | 15 / 10 /2026 18:15 | ३1 / 10 /2026 18:15 |
| 3) | तांत्रिक व व्यापारी लिफाफा उघडणे | 02 / 11 /2026 15:00 पासुन | |

| साहित्याचा / मालाचा तपशिल (संक्षिप्त) | अंदाजित पुर्वगणित रक्कम / मालाचे परिमाण | बयाणा रक्कम रु. | निविदा संच किंमत (ना परतावा) |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| अहिल्यानगर महानगरपालिका सर्व दवाखाने व रक्तपेढी करिता आवश्यक असलेली औषधे, रसायने, वैद्यकिय साहित्य व उपकरणे इ.पूरवठा<br><br>__टिप__ –<br>औषधे,रसायने,वेद्यकिय साहित्य व उपकरणांचा सविस्तर तपशिल निविदा प्रपत्र 'अ' मध्ये नमुद आहे. | 1,00,00,000=00 | 1,50,000.00 | 15,000.00 |

अहिल्यानगर महानगरपालिका उपरोक्त नमुद काम/मालाच्या पुरवठया करिता पुरवठादार/अधिकृत विक्रेते/उत्पादक यांचेकडून निविदा संचातील नमुद अटी व शर्ती नुसार निविदा संचासोबत जोडलेले प्रपत्र 'अ' मध्ये दर्शविलेले काम/माल खरेदीबाबत जाहिर वार्षिक ई-निविदा मागवत आहे.

__टिप :-__

1)सदर माल/कामाबाबत निविदा अटी,शर्ती इ.बाबतचा सर्व तपशील निविदा संचामध्ये नमूद केलेला असून निविदा संच ऑनलाईन पाहावयास उपलब्ध आहे.तसेच साहित्याचे कामाचे सविस्तर स्पेसिफिकेशन निविदा संचासोबत असलेल्या प्रपत्र 'अ' मध्ये नमुद केलेले आहे.

९५/९०

2)सदर कामाची निविदा संच खरेदी किंमत व बयाणा रक्कम स्वतंत्रपणे ICICI बँकेचे खात्यामध्ये ऑनलाईन भरावी लागेल.निविदा संच फि व बयाणा रक्कम हि फक्त ऑनलाईन पध्दतीने अदा करावी लागेल.

3)निविदा संचाची विक्री,सादरीकरण/स्वीकृती https://mahatenders.gov.in या वेबसाईटवरुन फक्त ऑनलाईन चालू आहे.

4)वेबसाईट वरुन निविदामध्ये सहभागी होण्यासाठी वेबसाईटवर युजर आयडी व पासवर्ड बनविणे बंधनकारक आहे.यासाठी किंवा ई-निविदा बाबत मार्गदर्शनासाठी 0120-4001002, 0120-4001005 या क्रमांकावर संपर्क करावा.

5)वरील निविदा, सादरीकरण/स्वीकृती फक्त ऑनलाईन पध्दतीने करण्यात येईल.पेटी पध्दत पुर्णपणे बंद करण्यात आलेली आहे.

6)औषधाच्या दर्जाविषयी पुरवठा करण्यात येणा-या औषध साठ्यातील प्रत्येक समुह क्रमांकातील किमान एक नमुना (Sample) शासन मान्यता प्राप्त NABL / FDA प्रमाणित प्रयोग शाळेकडून स्वखर्चाने तपासणी करून तपासणी अहवाल औषधांसोबत द्यावा लागेल.

7)मोठ्या प्रमाणात पुरवठा करण्यात येणा-या औषधीच्या वेष्टनावर औषधाचे नाव,उत्पादन तारीख, मुदतबाह्य तारीख, बॅच नंबर इ. बाबी तसेच 'for use of Government of Maharashtra Not for Sale' असे जांभळ्या किंवा हिरव्या रंगात ठळक अक्षरात मुद्रीत करून द्यावे लागेल.

8)पुरवठा करण्यात येणा-या औषधीच्या उत्पादनाची तारीख (Manufacturing Date) व मुदतबाह्य तारीख (Expiry Date) यानुसार औषधी वापराचा योग्यतेचा कालावधी हा किमान तीन चतुर्थांश कालावधी (3/4 Shelf Life Period) इतका असावा.

9)वरील निविदा सादरीकरण हे दोन पाकीट पध्दतीने (Technical Bid व Commercial Bid)करणे आवश्यक आहे.निविदा मधील प्रपत्र 'अ' मध्ये दर नमुद करुन सदरचे प्रपत्र व्यापारी लिफाफयामध्ये जोडण्यात यावे.

10)निविदा विक्रीच्या शेवटच्या दिवशी निविदा संच प्राप्त न झाल्यास व स्विकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑन लाईन सादरीकरण न झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी निविदा धारकाची राहील.

11)निविदा उघडण्याच्या अखेरच्या दिवशी कार्यालयीन सुट्टी आल्यास निविदा पुढील कार्यालयीन दिनांकास उघडण्यात येईल.

12)पुरवठादाराचे देयक फक्त इसीएस/एनईएफटी दवारेच प्रदान करण्यात येईल.त्यासाठी संबंधीत पुरवठादाराचे कोअर बँकींगची सुविधा असलेल्या बँकेतच खाते असणे बंधनकारक राहिल.

13)मा.महाराष्ट्र शासन उदयोग,उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रमांक:भांखस-2014/प्र.क्र.82/भाग-III/उदयोग-4 मादाम कामारोड,हुतात्मा राजगुरु चौक,मंत्रालय,मुंबई - 400032 दिनांक.1 डिसेंबर 2016 मधील तरतुदीनूसार अ.नं.1 ते 764 पैकी निविदा बयाणा रक्कम व निविदा संच किंमत माफीस पात्र असणा-या रसायने,वैदयकिय साहित्य व उपकरणे पुरवठया करिता निविदा माफीस पात्र असतील उर्वरित करिता निविदा दाखल करावयाची असल्यास निविदा बयाणा इसारा ठेव (ई.एम.डी.)रक्कम व निविदा संच किंमत भरणे बंधनकारक आहे.

14)निधी उपलब्धते नुसार पुरवठादाराचे देयक अदा करण्यात येतील.

15)कोणतीही निविदा स्वीकारणे, नाकारणे अथवा रद्द करणे याबाबतचे अंतीम अधिकार मा.आयुक्त,अहिल्यानगर महानगरपालिका यांना राहतील.

उपायुक्त (कर)
अहिल्यानगर महानगरपालिका

प्रत - मा.महापौर,अहिल्यानगर महानगरपालिका,

प्रत - मा.उपमहापौर,अहिल्यानगर महानगरपालिका,

प्रत - मा.आयुक्त,अहिल्यानगर महानगरपालिका,

प्रत - मा.सभापती - स्थायी समिती,अहिल्यानगर महानगरपालिका,

प्रत - मा.सभापती - महिला व बालकल्याण समिती,अहिल्यानगर महानगरपालिका,

प्रत - मा.उपसभापती - महिला व बालकल्याण समिती,अहिल्यानगर महानगरपालिका,

प्रत - मा.उपायुक्त (सा.),अहिल्यानगर महानगरपालिका,

प्रत - मा.उपायुक्त (कर),अहिल्यानगर महानगरपालिका,

यांचेकडेस माहितीस्तव सविनय सादर.

प्रत - संगणक विभाग प्रमुख,अहिल्यानगर महानगरपालिका यांस सदरची जाहिर टेंडर नोटीस महानगरपालिका वेबसाईट वर प्रसिध्द करणेबाबत कार्यवाही करावी.

प्रत - ई-निविदा कक्ष प्रमुख,अहिल्यानगर महानगरपालिका यांस सदरची जाहिर टेंडर नोटीस https://mahatenders.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करणेबाबत कार्यवाही करावी.

प्रत - हवलदार,अहिल्यानगर महानगरपालिका यांस सदरची जाहिर टेंडर नोटीस महानगरपालिका नोटीस बोर्डवर डकवून प्रसिध्द करणेबाबत कार्यवाही करावी.